| MHNB050008052018 | **नियमीत दिवाणी दावा क्र. ९२/२०१८**<br>**शिवशंकर पाटील व इतर**<br>**वि.**<br>**विश्वास पाटील व इतर** |
|---|---|

# निशाणी क्रमांक १५७ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दावा रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी यांचे कथन असे की, प्रस्तुत प्रकरणातील वादी क्रमांक १ हा दिनांक २५/०८/२०२५ रोजी मयत झालेला आहे. परंतू, वादी क्रमांक १ च्या मुखत्यार अथवा विधीज्ञांनी न्यायालयात वादी क्रमांक १ हा मयत झाला आहे हे कळविले नाही. वादी क्रमांक १ च्या मुखत्यार याने वेळोवेळी वेगवेगळे अर्ज दाखल केले आहेत. वादी क्रमांक १ मयत झाला ही बाब माहित असताना देखील, त्यांनी कळविले नाही व मुदतीत वारस अभिलेखावर आणले नाहीत म्हणून वादी क्रमांक १ याच्या विरुध्द दावा अबेट झाला. परिणामी, दावा रद्द करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

३. वादी यांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, मयत वादीचे वारसांना अभिलेखावर घेण्याबाबत तजविज करण्यास उशीर झालेला आहे. परंतू, त्यामागे वादीचा कोणताही गैरहेतू नाही. वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे निराकरण करण्यासाठी तांत्रीक बाबीकडे सहानूभूतीने पाहणे आवश्यक आहे. आज रोजी वादीने मयत वादी क्रमांक १ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी, विलंब माफीसाठी व अबेटमेंट आदेश सेटअसाईड होवून मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे, अभिलेखावरील कागदपत्रांचे व विधीज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्रमांक १ हा दिनांक २५/०५/२०२५ रोजी मयत झाला. सदर बाब वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या पुरशिस

निशाणी क्रं. १५८ व १५६ वरुन दिसून येते. वादी क्रमांक १ चे मुखत्यार म्हणून सुरेश शिवशंकर पाटील यांनी त्यांचा पुरावा दिनांक ११/०८/२०२२ रोजी सादर केला आहे. त्यामुळे वादी क्रमांक १ च्या मृत्यूनंतर त्याचे मुखत्यार याने पुरावा दाखल केला आहे हा युक्तीवाद ग्राहय धरता येणार नाही.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने मयत वादी क्रमांक १ याचे वारस मुदतीत घेतले नाही त्यामुळे प्रस्तुतचा दावा वादी क्रमांक १ विरुध्द अबेट झाला आहे परंतू, सदरचा दावा वादी क्रमांक १ ते ३ यांनी दाखल केला असल्याने संपूर्ण दावा रद्द करणे योग्य होणार नाही. वादी क्रमांक १ च्या विधीज्ञांनी अथवा त्याच्या मुखत्यार यांनी सदर बाब अभिलेखावर वेळेत आणलेली नाही. अशा परिस्थीतीत वादी क्रमांक १ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला अर्ज, विलंब माफीचा अर्ज व अबेटमेंट रद्द होवून मिळण्यासाठीचा अर्जावर आदेश करते वेळी सदर बाब विचारात घेतली जाईल. अशा परिस्थीतीत वादी क्रमांक १ याचे वारस अभिलेखावर मुदतीत घेतले नाही म्हणून संपुर्ण दावा रद्द करणे न्यायोचीत होणार नाही. परिणामी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज निशाणी १५७ नामंजुर करण्यात येतो.

**२.** खर्चाबाबत आदेश नाही.

MANOJ CHANDRAKANT NEPTE
Digitally signed by MANOJ CHANDRAKANT NEPTE
Date: 2026.06.24 16:00:08 +0530

शहादा
दिनांक २४/०६/२०२६

(**मनोज चं. नेपते**)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, शहादा,
जि. नंदुरबार

**CERTIFICATE**

I hereby certify that the contents of this PDF file are word to word as per the original order

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Nilesh B. Bhamare |
| Name of the Court | :- | Civil Court, Senior Division, Shahada |
| Date of announcement of order | :- | 24/06/2026 |
| Date of signing of order | :- | 24/06/2026 |
| Date of uploading PDF File | :- | 24/06/2026 |